# अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना

## सतत विचारले जाणारे महत्वाचे प्रश्न

1) MINORITY शिष्यवृत्तीसाठी कोणत्या प्रकारचे दस्तऐवज (कागदपत्रे ) आवश्यक आहेत?

उत्तर:

i) एसएससी मार्कशीट आणि पुढील वर्षाचे मार्कशीट

ii) उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवास असल्याचे प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र)

iii) उत्पन्न आणि अल्पसंख्यांक घोषणापत्र (annexure- I) (संकेतस्थळावर उपलब्ध आहे) किंवा तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त केलेले उत्पन्न प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला (अल्पसंख्यांकाचा पुरावा).

iv) प्रवेश शुल्क भरल्याची पावती.

2) मी MINORITY योजनेसाठी वडील किंवा आई किंवा भाऊ किंवा बहीण यांचे अधिवास प्रमाणपत्र अपलोड करू शकतो का?

उत्तर: नाही, केवळ योजनेसाठी फक्त उमेदवारांचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे.

3) कोणत्या प्रकारचे उमेदवार नूतनीकरण - होय हा पर्याय निवडू शकतात?

उत्तर: जर उमेदवाराने मागील वर्षी त्याच शिष्यवृत्ती योजनेसाठी त्याच संस्था मधून अर्ज केला असेल, तर तो चालू शैक्षणिक वर्षासाठी नूतनीकरण-'होय' म्हणून हा पर्याय निवडू शकतो.

4) जर विद्यार्थ्याला इतर कोणत्याही विभागाकडून इतर शिष्यवृत्ती/विनामूल्य शिप/स्टायपेंड मिळत असेल तर तो योजनेसाठी अर्ज करू शकतो का?

उत्तर: नाही,

5) महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्र (MKB) उमेदवार अल्पभूधारक योजनेसाठी पात्र होऊ शकतात का?

उत्तर: होय, Type ई श्रेणीतील CAP अंतर्गत प्रवेश घेतलेले उमेदवार अल्पभूधारक योजनेसाठी पात्र आहेत

6) मी विवाहित आहे (महिला उमेदवार). वडील किंवा पती यांच्या पैकी कोणाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र अपलोड करू?

उत्तर: जर महिला उमेदवार विवाहित असेल तर, पतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व सोबत विवाह प्रमाणपत्र/ नाव बदलेले राजपत्र प्रमाणपत्र अपलोड करा.

7) मी संस्था स्तरावर (Against CAP/Institute level) प्रवेश घेतला आहे मी अल्पसंख्याक योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहे का?

उत्तर: होय. आपण पात्र आहात

8) अल्पसंख्याक समुदायाचे कोण आहेत?

उत्तर: मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारसी, जैन, ज्यू समुदाय उमेदवार अल्पसंख्या योजनेसाठीं पात्र आहेत.

9) माझ्याकडे कुटुंब/ पालक वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र नाही. पण माझ्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न 8 लाखांपेक्षा कमी आहे, मी या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहे का?

उत्तर: होय, अल्पसंख्याक योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक नाही. उत्पन्न आणि अल्पसंख्यांक घोषणापत्र (annexure- I) किंवा तहसीलदार कार्यालयाकडून प्राप्त केलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला (अल्पसंख्यांकाचा पुरावा) आवश्यक आहे.

10) ह्या योजनेसाठी आधार क्रमांक द्वारे नोंदणी आवश्यक आहे का?

उत्तर: होय विद्यार्थाकडे स्वतःचे आधार क्रमांक असणे आवश्यक आहे व ते बँकेला लिंक असणे गरजेचे आहे

11) माझ्याकडे दोन बँक खाते आहे तर माझा कोणत्या बँक मध्ये शिष्यवृत्ती रक्कम जमा होईल ?

उत्तर: ज्या बँक खात्यामध्ये आधार क्रमांक लिंक असेल त्या बँक मध्ये शिष्यवृत्ती रक्कम जमा होईल

12) आधार क्रमांक फॉर्म मध्ये उपडेट करत असताना Aadhar already Exiest असा error येत आहे तर पुढे काय करता येईल?

उत्तर: Aadhar already Exiest असा error येत असेल तर तुमचे दोन user ID तयार झाले आहे ,अशावेळी एक user ID हा Deactivate करावा लागतो त्यासाठी संस्थेत संपर्क साधावा.

माहितीपत्रकात वापरलेले संक्षेप.

- EBC - राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
- AICTE - अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद.
- CAP कॅप - केंद्री भूत प्रवेश प्रक्रिया.
- EWS - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक.
- OMS - महाराष्ट्र राज्याबाहेरील.
- SSC - माध्यमिक शालेय प्रमाणपत्र.
- TFWS - शिक्षण शुल्क माफी योजना.
- SEBC उमेदवार - विशेष मागास वर्ग.
- Against CAP /Institute Level - "इन्स्टिट्यूशनल कोटा" म्हणजे

  वेळोवेळी शासन किंवा योग्य प्राधिकरणाने घोषित केल्याप्रमाणे संस्था स्तरावर पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी उपलब्ध जागा;

- अल्पसंख्याक उमेदवारी.- राज्यातील विशिष्ट भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्याक समुदायाचे आणि अधिवेशनाद्वारे शासनाने अधिसूचित केलेले महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र.असल्याचे उमेदवार या श्रेणी अंतर्गत पात्र आहेत.
- Type - E उमेदवार / महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्रातील उमेदवार - महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र - कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला , एसएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला ,आणि ज्याची मातृभाषा मराठी आहे असा उमेदवार (महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील गावांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)